दिनांक :    .    .२०१९

प्रति,

**मा. केंद्रीय गृहमंत्री,**

**भारत सरकार, नवी देहली.**

**विषय : आसामसह देशभरात 'राष्ट्रीय नागरिक नोंदणी' (एन्.आर्.सी.) लागू करावे आणि बांगलादेशीच नव्हे, तर पाकिस्तानी, रोहिंग्या यांसारखे अन्य देशांतून आलेल्या घुसखोर मुसलमानांना देशाबाहेर काढण्याविषयी...**

महोदय,

आसाममध्ये बांगलादेशी घुसखोर कोण आणि मूळ आसामी नागरिक कोण, याची माहिती देणारी 'राष्ट्रीय नागरिक नोंदणी' पुस्तिकेची ('नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन'ची) अंतिम सूची ३१ ऑगस्ट २०१९ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली असून यात ३ कोटी ११ लाख २१ लोकांची नावे असून १९ लाख ६ हजार ६५७ लोकांच्या नावाचा समावेश नाही. गतवर्षी आलेल्या प्राथमिक सूचीत ४० लाख लोकांची नावे नव्हती. यानंतर काही पुरावे सादर केल्यावर सुमारे २१ लाख लोकांची नावे यात समाविष्ट करण्यात आली. या नोंदणी पुस्तिकेनुसार ज्यांचे नाव सूचीत नाही, त्यांना विदेशी नागरिक समजण्यात आले आहे. याचा अर्थ असा की, १९ लाख लोक सध्या आसाममध्ये अवैधरित्या म्हणजे घुसखोरी करून राहत आहेत. आजपर्यंत घुसखोरांच्या या मोठ्या संख्येमुळे आणि अल्पसंख्यांकाच्या नावाखाली त्यांना मिळत असलेल्या सुविधांमुळे आसामधील हिंदु समाज सुविधांपासून वंचित राहत आहे. देशभरात असलेल्या या घुसखोरांमुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत, त्यामुळे ही एक समस्या राष्ट्रीय बनली आहे.

*** तरी या संदर्भात आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो ....**

१. भारतात बांगलादेशी घुसखोरांची समस्या ही दिवसेंदिवस जटील होत चालली आहे. भारतात अनेक शहरात बांगलादेशी मजूर वर्गासाठी सुरक्षित वस्त्या आहेत. तब्बल ५ कोटींहून अधिक बांगलादेशी घुसखोर मुसलमान भारतात रहातात. याचा अर्थ भारताची ४ टक्के लोकसंख्या बांगलादेशी घुसखोर आहे. भारतीय जनतेच्या मूलभूत सुविधांवर या घुसखोरांमुळे अधिक ताण येत आहे. याहून गंभीर म्हणजे यांच्यापैकी अनेक जण आतंकवादी, तसेच राष्ट्रविरोधी कारवायांमध्ये गुंतले असल्याचे वेळोवेळी उघड झाले आहे. या घुसखोरांना भारतात शोधून काढणे तसे अवघड आहे; मात्र राष्ट्रीय नागरिक नोंदणी पुस्तिकेच्या माध्यमातून सरकारला आसाममध्ये किमान १९ लाख घुसखोर रहात आहेत, हे तरी स्पष्ट झाले आहे.

२. 'या १९ लाख घुसखोरांचे करायचे काय ?', याविषयी सरकारकडून काही घोषणा अद्याप झालेली नाही. एका माहितीनुसार या घुसखोरांना पुढील १० वर्षे मतदान करता येणार नाही; मात्र मुख्यमंत्री सोनोवाल यांनी 'ज्यांचे नाव या सूचीत नाही, त्यांना काळजी करण्याचे कारण नसून ते 'ट्रिब्युनल'कडे अपील करू शकतात', असे सांगितले आहे. असे ४०० ट्रिब्युनल आसाम सरकार स्थापन करणार असून त्यांना कायदेशीर साहाय्यही पुरवले जाणार आहे. 'ट्रिब्युनलकडे तक्रार दाखल करण्यासाठी या लोकांना १२० दिवस म्हणजे ४ मासांची मुदत देण्यात आली आहे. इतके झाल्यावरही सूचीत नाव समाविष्ट न झाल्यास या लोकांना उच्च न्यायालयात जाण्याची मुभा देण्यात आली आहे. ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कुणालाही देशातून बाहेर काढले जाणार नाही', असे सरकारने स्पष्ट केले आहे. आतापर्यंत आसामी हिंदु आणि बांगलादेशी घुसखोर यांच्यात हिंसाचार होऊन शेकडोंचे प्राण गेले आहेत. असे असतांना या घुसखोरांवर दया दाखवण्यात येऊ नये, अशी हिंदु समाजाची धारणा आहे.

३. राष्ट्रीय अन्वेषण यंत्रणेचे (एन्.आय.ए.चे) महासंचालक वाय.सी. मोदी यांनी माहिती दिली की, 'जमात-उल-मुजाहिदीन बांगलादेश' (जे.एम्.बी.) ही बांगलादेशी आतंकवादी संघटना बांगलादेशी घुसखोरांच्या माध्यमातून देशात

जलदगतीने पसरत आहे. आसाम, झारखंड, महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळ येथे ही संघटना सक्रीय आहे. तिच्या १२५ संशयित आतंकवाद्यांची सूची संबंधित राज्यांना सोपवण्यात आली आहे.

४. एन्.आय.ए.चे महानिरीक्षक आलोक मित्तल यांनी सांगितले की, वर्ष २०१४ ते २०१८ या कालावधीत जे.एम्.बी.ने बेंगळुरूमध्ये २० ते २२ ठिकाणे बनवली होती. यातून दक्षिण भारतात पाय पसरण्याचा प्रयत्न करण्यात आला. या संघटनेने कर्नाटक सीमेवरील कृष्णागिरी येथे रॉकेट लाँचर्सचीही चाचणी केली होती. म्यानमारमध्ये रोहिंग्या मुसलमानांवरील आक्रमणाचा सूड घेण्यासाठी ही संघटना बौद्ध मंदिरांवर आक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहे.

५. घुसखोरी ही देशात आतंकवादाला प्रोत्साहन देणारी असून केवळ बंगालमध्ये १ कोटीहून अधिक, तर देहली आणि मुंबई या महत्त्वाच्या शहरांसह देशातील विविध राज्यांत लाखो बांगलादेशी घुसखोर वास्तव्य करत आहेत.

६. वर्ष २००४ मध्ये काँग्रेसचे नेते आणि तत्कालीन केंद्रीय गृहराज्यमंत्री श्रीप्रकाश जैस्वाल यांनी 'देशात १ कोटी २० लाख ५३ सहस्र ९५० बांगलादेशी घुसखोर, तर आसाममध्ये ५० लाख बांगलादेशी घुसखोर आहेत', असे वक्तव्य संसदेत केले होते. तेव्हाच घुसखोरांची संख्या इतकी होती, ती आताच्या स्थितीत काही कोटींनी वाढली असणार, हे निश्चित !

७. गेल्या २ वर्षांत, म्हणजेच वर्ष २०१६ आणि २०१७ या कालावधीत आसाम सरकारने आसाममधून फक्त ३९ बांगलादेशी घुसखोरांना त्यांच्या देशामध्ये, तर केंद्र सरकारने गेल्या ३ वर्षांत, म्हणजेच वर्ष २०१४ ते २०१६ या कालावधीत ३३० पाकिस्तानी आणि १,७७० बांगलादेशी घुसखोरांना त्यांच्या देशात परत पाठवले आहे.

८. जगामध्ये चीन खालोखाल सर्वाधिक लोकसंख्या असलेला आपला देश लोकसंख्येच्या विस्फोटामुळे विविध समस्यांना तोंड देत आहे. त्यात अशा घुसखोरांमुळे भारतियांच्या समस्या अधिक तीव्र बनत चालल्या आहेत.

९. आसाम येथे ही सूची घोषित केल्यावर बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी ही सूची बंगालमध्ये लागू करण्यास विरोध केला आहे; कारण आसामप्रमाणेच बंगालमध्येही बांगलादेशी घुसखोरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.

**✻ तरी या प्रकरणी आमच्या पुढील मागण्यांवर शासनाने कार्यवाही करावी, ही विनंती !**

१. केंद्र शासनाने आता देशभरातील बांगलादेशी, रोहिंग्या आणि पाकिस्तान येथून आलेल्या घुसखोरांची संख्या नेमकी किती आहे, ते जाणून घेण्यासाठी सर्व राज्यांना 'राष्ट्रीय नागरिक नोंदणी पुस्तिके'ची ('नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन') सूची कालमर्यादेत सिद्ध करण्याचे निर्देश तात्काळ द्यावेत.

२. सर्व राज्यांना असलेल्या घुसखोरांना हाकलण्याच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्याचे आदेश केंद्र शासनाने द्यावेत.

३. भारताच्या सीमा अवैधपणे ओलांडून भारतात येण्यास कोणी धजावणार नाही, अशी या घुसखोरांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

४. घुसखोरी ही देशाच्या सुरक्षिततेशी निगडीत गंभीर समस्या असल्याने देशाच्या सीमा सुरक्षित करण्यासाठी कठोर पावले उचलावीत आणि सीमेवर आवश्यक त्या उपाययोजना तात्काळ कराव्यात.

५. घुसखोरांची सूची, छायाचित्रे संबंधित भागांमध्ये प्रसारित करावीत, त्यांना कुठेही नोकरी मिळू नये, भाड्याने अथवा विकत घर मिळू नये अशी व्यवस्था करावी, तसेच घुसखोरांची व्यवस्था करणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात यावी.

आपला विश्वासू,

संपर्क :